CMYK

वरुण राजाची वक्रदृष्टी; शेतकऱ्यांचे डोळे लागले आभाळाकडे >> पान 2

उकळी येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते जोरदार स्वागत >> पान 3

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव बनले विद्यार्थ्यांचे सारथी >> पान 4

**सुविचार**

जीवनात नेहमी पुढे जाण्याचा प्रयत्न करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 283 ■ मंगळवार, दि. 24 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**विजय देवरकोंडा अडचणीत, एससी-एसटी कायद्यांतर्गत तक्रार दाखल**

आतील पान

## कॅबमध्ये महिला वैमानिकाचा लैंगिक छळ; चालकासह तिघांविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** देशाच्या आर्थिक राजधानी २८ वर्षीय महिला वैमानिकाचा प्रवासादरम्यान लैंगिक छळ झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी कॅबचा चालक आणि इतर दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महिला वैमानिक गुरुवारी रात्री ११.१५ च्या सुमाराला दक्षिण मुंबईहून घाटकोपर येथील तिच्या घरी परतत असताना तिचा विनयभंग झाल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यानं दिली. पीडित महिलेचा पती संरक्षणदलात अधिकारी आहे. परंतु अधिकाऱ्याला सरकारी निवासस्थान मि ळालेलं नाही.

गुरुवारी रात्री तिनं दक्षिण मुंबईतील एका रेस्टॉरंटमध्ये जेवण केल्यानंतर तिच्या पतीने तिच्यासाठी उबर राईड बुक केली. त्यानंतर महिलेनं कॅबमधून घरी जाण्याला सुरुवात केली. मात्र, कॅब चालकानं २५ मिनिटानंतर मार्ग बदलला. त्यानंतर अचानक दोन पुरुषांना कॅबमध्ये बसण्याला परवानगी दिली. तेव्हा प्रवासात बसलेल्या शेजारी बसलेल्या एका व्यक्तीनं पीडित म हिलेला अयोग्यरित्या स्पर्श केला, असे तिनं पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे.

## पंढरपूर महामार्गावर आलिशान कार थेट 300 फूट दरीत कोसळली; दोघे गंभीर जखमी, उपचारासाठी बीडला हलवले

**पंढरपूर/प्रतिनिधी :** खामगाव-पंढरपूर महामार्गावर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. रविवारी पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली असून, एका आलिशान गाडीचा ३०० फूट खोल दरीत कोसळून अपघात झाला. या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथे उपचार सुरू आहेत. ही दुर्घटना धारूर येथून परभणीकडे निघालेल्या गाडीतील वाहन चालकाला वळणाचा अंदाज न आल्याने ही घटना घडली आहे. धारूर घाटात असलेल्या म्हसोबा मंदिराजवळील तीव्र उतारावर वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही गाडी थेट ३०० फ ूट खोल दरीत कोसळली. या वाहनात भीमराव घायाळ आणि संदीप घायाळ हे दोघे प्रवासी होते. अपघातात दोघेही प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर दोघांनाही तातडीने स्थानिकांच्या मदतीने बाहेर काढून बीड येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. धारूर घाटात सुरक्षेसाठी कुठलीच व्यवस्था नसल्याने या ठिकाणी हे वारंवार अपघात होत आहेत.

# इराण-इस्रायल युद्धाच्या झळा!; गॅस सिलिंडर महागणार

**नवी दिल्ली : इराणच्या तीन मुख्य आण्विक तळांवर अमेरिकेने केलेल्या हल्लयांमुळे जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक प्रदेशातून पुरवठा खंडित होण्याची भीती आणखी वाढली आहे. आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांटमध्ये भारताची एलपीजी साठवण क्षमता राष्ट्रीय सरासरी वापराच्या फक्त १६ दिवसांसाठी पुरेशी आहे. इराण आणि इस्रायलमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम तुमच्या स्वयंपाकघरातही दिसून येतो. येत्या काळात देशात एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढू शकतात.**

## स्टॉक फक्त १६ दिवस पुरेल इतकाच

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम सिलिंडरच्या दरांवर दिसून येतो. कारण देशातील प्रत्येक ३ एलपीजी सिलिंडरपैकी २ पश्चिम आशियातून येतात.

इराणच्या तीन मुख्य आण्विक तळांवर अमेरिकेने केलेल्या हल्लयांमुळे जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक प्रदेशातून पुरवठा खंडित होण्याची भीती आणखी वाढली आहे. आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांटमध्ये भारताची एलपीजी साठवण क्षमता राष्ट्रीय सरासरी वापराच्या फक्त १६ दिवसांसाठी पुरेशी आहे.

इराणच्या अणुस्थळांवर अमेरिकेच्या हल्लयांमुळे जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक प्रदेशातून पुरवठा खंडित होण्याची भीती आणखी वाढली आहे. अशा परिस्थितींसाठी तयारी करताना, भारतीय धोरणकर्ते आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी हे ओळखले आहे की सर्व इंधने समान धोके निर्माण करत नाहीत. पश्चिम आशियामध्ये तणाव वाढतो तेव्हा एलपीजी सर्वात जास्त असुरक्षित असते. गेल्या दशकात, सरकारच्या प्रयत्नांमुळे, भारतात एलपीजीचा वापर दुप्पट होऊन ३३ कोटी कुटुंबांवर पोहोचला आहे. यामुळे देशाचे आयातीवरील अवलंबित्व वाढले आहे. एकूण एलपीजीपैकी सुमारे ६६% परदेशातून येतो आणि त्यापैकी सुमारे ९५% सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती



(यूएई) आणि कतार सारख्या पश्चिम आशियाई देशांमधून येतो.

इकॉनॉमिक टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांटमध्ये भारताची एलपीजी साठवण क्षमता राष्ट्रीय सरासरी वापराच्या फक्त १६ दिवसांसाठी पुरेशी आहे.

## नाशिकमध्ये पावसाची संततधार, गंगापूर धरणातून विसर्ग वाढवला, प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यात मागील चार ते पाच दिवसांपासून संततधार पावसाने हजेरी लावली असून, ग्रामीण भागासह शहरातही मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. यामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक होत असून, गंगापूर, दारणा, नांदूरमध्यमेश्वर यांसारख्या धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सतत जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे, दुपारी २ वाजेपासून धरणातून ६,१६० क्यूसेक वेगाने पाणी सोडण्यात येणार आहे. यापूर्वी या धरणातून ४ हजार क्यूसेक विसर्ग सुरू होता. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास, पाण्याचा विसर्ग आणखी वाढवण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## पुढील दोन दिवसात कोकण-मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस

### मराठवाड्यात विजा-वादळांसह पावसाचा अंदाज



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुढील दोन ते तीन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील काही भागातही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर उर्वरित ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

राज्याच्या अनेक भागात हलका-मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबई आणि ठाण्यामध्ये मध्यम सरी कोसळण्याची शक्यता आहे. तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाट, सातारा घाट येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पुढील दोन दिवसात मराठवाड्याच्या काही भागात वीज आणि वादळांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यादरम्यान हवेचा वेग हा ३० ते ४० किमी प्रति तास असण्याची शक्यता आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. मनोर-विक्रमगड रस्त्यावरील पूल पाण्याखाली गेल्याने रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तसंच, पासमाडजवळ रस्ता पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान पालघर जिल्ह्याला आज सकाळपासूनच ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

नाशिकमध्ये सोमवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. मुसळधार पावसामुळे नाशिकमधील धरणात वेगानं पाण्याची आवक होत असल्यानं पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला. गंगापूर धरणातून ६ हजार १६० क्यूसेक वेगानं पाणी सोडण्यात आलं आहे. गोदावरी नदीच्या पाणीपात्रात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून नदीकाठच्या नागरिकांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

## किराणा दुकानात गेला, सिगारेट उधारीवर न दिल्याने रात्री धारदार शस्त्रासह अल्पवयीन मुलाने महिलेचा केला खून

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहरातील रमाबाई नगर भागातून धक्कादायक घटना समोर आली आहे .सिगारेट उधारीवर न दिल्याच्या रागातून अल्पवयीन म ुलाने महिलेचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे . या घटनेने संपूर्ण चंद्रपूर शहर हादरले आहे . चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथील ५ दिवसांपूर्वी घडलेल्या खुनाचा उलगडा झाला आहे.

नेमकं घडलं काय ?

चंद्रपूर शहरातील राजुरामध्ये १५ जून रोजी एका महिलेचा खून झाल्याची घटना उघडकीस आली होती . आता पाच दिवसांनी या खुनाचा उलगडा झाला असून संपूर्ण शहर हादरले आहे . राजुरा शहरातील रमाबाई नगर येथे सिगारेट उधारीवर न दिल्याच्या रागातून अल्पवयीन मुलाने धारदार शस्त्राने वार करत महिलेचा खून केल्याचं समोर आला आहे . कविता रायपुरे (५३) असे मृत महिलेचे नाव आहे .

कविता रायपुरे यांचे रमाबाई नगर येथे किराणा दुकान होते .घटनेच्या दिवशी एक अल्पवयीन मुलगा त्यांच्या दुकानात आला . मुलाने महिलेकडे सिगारेट उधारीवर मागितली .मुलाकडे पैसे नसल्यामुळे त्यांनी सिगारेट देण्यास नकार दिला .उधारीवर सिगारेट न दिल्याचा राग मनात ठेवून रात्री १२ ते १च्या सुमारास घरात कोणी नसल्याचे पाहत आरोपी अल्पवयीन मुलगा घराच्या सुरक्षा भिंतीवरून उडी मारत आत शिरला . महिलेच्या घरात शिरून धारदार शस्त्राने वार करत कविता रायपुरे या महिलेला ठार केले .म हिलेला तिथेच सोडून आरोपी मुलगा फरार झाला .

घटना उघडकीस आल्यानंतर राजुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली .घटनेचा पंचनामा करत अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला .नंतर म ोबाईल लोकेशनच्या मदतीने आरोपी तरुणास बाहेरगावातून ताब्यात घेण्यात आले . घटनेच्या पाच दिवसानंतर तपासात पोलिसांना यश आल्या असून अल्पवयीन आरोपीला राजुरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे .आरोपी विरोधात कलम ३३२ (ब ), १०३ (१) या कलमान अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत .या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून सिगारेट उदाहरण दिल्याच्या रागातून घडलेल्या या साऱ्या प्रकारामुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे . अनेक ठिकाणांवरील सीसीटीव्ही फ ुटेजची तपासणी केली आणि ४० हून अधिक संशयितांची चौकशी केली. चौकशीदरम्यान, मुलाने गुन्ह्याची कबुली दिली आणि सिगारेटच्या वादाम ुळे त्याचा राग आला असे सांगितले. त्याच्या ताब्यातून खून करण्यासाठी वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले. अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे.

**शाळेचा पहिला दिवस उत्साहात!**

# सिनगाव जहाँगीर येथे शाळा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा

# शिक्षणमंत्री ना.दादाजी भुसे यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील सिनगाव जहाँगीर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोमवारी 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचा पहिला दिवस खास बनवण्यासाठी विद्यार्थ्यांचे डफडे, ढोलताशाच्या गजरात वाजतगाजत स्वागत करण्यात आले. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान, गावातून विद्यार्थ्यांची पारंपरिक बैलगाडी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीनंतर शाळेच्या सत्राचे उद्घाटन शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांच्या हस्ते शाळेची घंटा वाजवून व फीत कापून करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन









प्रेमाने स्वागत केले. या प्रसंगी आमदार मनोज कायंदे, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते. यावेळी परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते.

या प्रसंगी बोलताना शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे म्हणाले, ''राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमधून गुणवंत विद्यार्थी घडत आहेत. पहिली ते बारावीत सुमारे दोन कोटी बारा लाख विद्यार्थी असून हा आपला परिवार आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी शासनाला असून यापुढे प्रत्येक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. गरज असल्यास राज्य शासन गंभीर विद्यार्थ्यांवर मुंबईतील रुग्णालयात उपचार करणार आहे.'' ते पुढे म्हणाले, ''आजची पिढी तंत्रज्ञान स्नेही आहे. आपल्याला तंत्रज्ञान व आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगाशी जुळवून घ्यायचं आहे. यासह विद्यार्थ्यांना शेतावर सहलीसाठी नेण्याची योजना आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषद व नगरपालिकेतील शाळांमध्ये सुसज्ज भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. शिक्षणाची अत्याधुनिक साधने निर्माण करण्यावर शासनाचा भर असेल. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असेल,'' असेही मंत्री ना. भुसे यांनी सांगितले.

पालकांना मोलाचा संदेश

''विद्यार्थ्यांच्या आईवडील, आजीआजोबांनी दररोज संध्याकाळी मुलांशी अर्धा तास गप्पा माराव्या. यामुळे त्यांच्या अडचणी समजतील व नातं घट्ट होईल. तसेच पालकांनी आपल्या पाल्याला बाजारातील व्यवहार, शेतीशी निगडित ज्ञान देणे गरजेचे आहे.''

या शाळा प्रवेशोत्सवात इयत्ता पहिली मधील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. त्यामध्ये शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, गावकरी, पालक, माता पालक ढोल पथक सहभागी झाले होते.

यावेळी शालेय शिक्षण मंत्री ना. भुसे यांच्या हस्ते नव प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत, दप्तर, गणवेश, बूट सॉक्स, कंपास, वही व पेन व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

एक पेड मॉ के नाम

शाळा प्रवेशोत्सवात 'एक पेड मॉ के नाम' हा वृक्षारोपणाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईच्या नावे वृक्ष लागवड केली.

बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान शिक्षणमंत्री ना. भुसे यांनी जिल्ह्यातील पांगरी येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेला भेट दिली. या शाळेमध्ये 'फ्यूचरिस्टिक क्लासरुम' या उपक्रमाचे उद्घाटन केले. तसेच भिवगाव येथील जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट देत तेथील परिस्थिती जाणून घेतली.

CMYK

## अमेरिकेचे कुटील धोरण

सध्या अमेरिकेला पाकिस्तान प्रेमाचा भलताच उमाळा आहे. पाकिस्तान हा दहशतवाद पसरवणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश असून पाकिस्तान हीच दहशतवादाची फॅक्टरी आहे हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानसाठी पायघड्या घालत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे तर पाकिस्तान प्रेम उतू चालले आहे. पाकिस्तान आपल्यासाठी खास देश आहे असे वक्तव्य त्यांनी नुकतेच केले आहे इतकेच नाही तर पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी यांना त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये खास निमंत्रण देऊन त्यांच्यासोबत जेवण करत त्यांची सरबराई केली. अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी एखाद्या देशाच्या लष्करप्रमुखाला बोलावून त्याचा इतका मोठा सन्मान केला आहे. व्हाइट हाऊसमध्ये देशाचे प्रतिनिधी म्हणून देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान किंवा मंत्र्यांना निमंत्रित केले जाते. पाकिस्तानचे जनरल जिया – उल – हक, जनरल आयुब खान आणि जनरल परवेज मुशर्रफ यांना व्हाईट हाऊसने निमंत्रण दिले होते पण ते पाकिस्तानचे लष्करप्रमुख म्हणून नव्हे तर पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून. व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या या भेटीत या दोघांत विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चेनंतर ट्रम्प यांनी भारत पाकिस्तान युद्ध आपणच थांबवल्याचा पुनरुच्चार केला. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिफ मुनीर यांनी भारत पाकिस्तान युद्ध थांबवल्याबद्दल ट्रम्प यांचे आभार मानून भारत पाकिस्तान युद्ध थांबल्याबद्दल ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी केली. हे सर्व अचंबित करणारे आहे. ज्या पाकिस्तानमुळे जगात दहशतवाद पसरत आहे त्याच पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला ट्रम्प बोलावतात त्यांच्यासोबत जेवण करतात. हा ट्रम्प यांचा दुटप्पीपणाच आहे. दहशतवादा विरोधातील लढाईत अमेरिकेचे धोरण किती संधीसाधू आणि स्वार्थी आहे हेच यातून दिसून येते. जनरल आसिफ मुनीर यांना भेटून ट्रम्प काय साध्य करू इच्छितात? ज्या पाकिस्तानला भारत क्रमांक एकचा शत्रू मानतो त्या पाकिस्तानला जवळ करण्यामागे ट्रम्प यांचा उद्देश काय ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर इराण इस्त्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धात मिळेल. मागील आठवड्यात इस्त्राईलने इराणच्या आण्विक केंद्रावर हल्ला केला. याला प्रतिउत्तर म्हणून इराणनेही इस्त्राईलवर मोठा हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही देशांचे शेकडो नागरिक आणि सैनिक मरण पावले. हा संघर्ष अजूनही चालू आहे. या युद्धाआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते आयातुला खोमेनी यांना अमेरिकेशी आण्विक करार करण्याची गळ घातली मात्र खोमेनी यांनी ती स्पष्टपणे नाकारली. जर तुम्ही आमचे ऐकणार नसाल तर तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल अशी धमकीच ट्रम्प यांनी तेंव्हा खोमेनी यांना दिली होती. त्यानंतर काही दिवसातच इस्त्राईलने इराणवर हल्ला केला याचाच अर्थ अमेरिकेच्या चिथावणीवरूनच इस्त्राईलने हा हल्ला केला. एकीकडे भारत पाकिस्तान युद्ध मी थांबवले असा डंका पिटत स्वतःला नोबेल पुरस्कार देण्याची मागणी करायची दुसरीकडे इस्त्राईल आणि इराणमध्ये युद्ध पेटवून द्यायचे. ट्रम्प यांचा हा कुटील डाव आता जगाच्या समोर आला आहे. इस्त्राईलने इराणवर हल्ला करूनही इराण आपले ऐकत नाही हे लक्षात आल्यावर ट्रम्प यांनी या युद्धात इस्त्रायलच्या बाजूने उतरण्याची धमकी दिली. या धमकीलाही इराणने जुमानले नाही त्यामुळे ट्रम्प तात्यांचा तिळपापड झाला आणि अखेर रविवारी अमेरिकेने या युद्धात प्रत्यक्ष भाग घेत इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर संपूर्ण जगभर खळबळ माजली असून अमेरिकेने या युद्धात प्रवेश करणे ही तिसऱ्या युद्धाची नांदी ठरू शकते असे जाणकार म्हणत आहेत. कारण या हल्ल्यानंतर इराणला अनेक देशांनी पाठिंबा दिला असून अमेरिकेचा निषेध केला आहे. या हल्ल्यानंतर इराणने रशियाशी संधान बांधले असून रशियाने इराणला पाठिंबा दिला आहे. अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ला केला तर रशिया इराणच्या बाजूने युद्धात उतरेल असे आश्वासन इराणला रशियाने दिले आहे. जर रशिया या युद्धात उतरलाच तर तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटेल. अशा अवस्थेत अमेरिकेला आशिया खंडात स्वतःचा हक्काचा लष्करी तळ हवा आहे आणि पाकिस्तान हा त्यासाठी सर्वात सोईस्कर आणि योग्य देश आहे अशी त्यांची धारणा आहे. भविष्यात इराण आणि रशिया विरुद्ध लढ्यासाठी पाकिस्तानची भूमी वापरता यावी यासाठीच ट्रम्प यांची ही खेळी आहे. पाकिस्तानला चुचकारण्यामागे ट्रम्प यांचा हाच उद्देश आहे. अर्थात पाकिस्तानच्या हे लक्षात न येण्याइतका पाकिस्तान दुधखुळा नाही. पाकिस्तानला हे माहीत असूनही पाकिस्तान ट्रम्प यांच्या जाळ्यात अडकतोय कारण त्यात त्यांचाही स्वार्थ आहे. भविष्यात जर भारताने ऑपरेशन सिंदूर सारखी कारवाई केली तर अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घ्यावी असे त्यांना वाटते म्हणजेच या भेटीमागे अमेरिका आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा स्वार्थ आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी हे दोन्ही देश जगाला युद्धाच्या खाईत लोटत आहेत म्हणूनच या दोन्ही स्वार्थी देशांविरुद्ध जगाने एक होण्याची गरज आहे.

# वरुण राजाची वक्रदृष्टी; शेतकऱ्यांचे डोळे लागले आभाळाकडे

## तालुक्यातील ४० टक्के पेरण्या आटोपल्या तर ६० टक्के पेरण्या खोळंबल्या




**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर /प्रतिनिधी :** खरिपाची पेरणी आटोपताच शेतकऱ्यांना आषाढी एकादशी निमित्त पांडुरंगाचे दर्शन घेण्याची ओढ लागते. एकीकडे शेतकऱ्यांचे पावले पंढरपूरच्या वाटेने चालले असतानाच दुसरीकडे मात्र, शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. जिल्ह्यातील तालुक्यातील जवळपास ४० टक्के पेरण्या आटोपल्या असून त्यांना पावसाची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. तर, दुसरीकडे ६० टक्के पेरण्या खोळंबल्याने शेतकऱ्यांचा जीव कासावीस झाला आहे.तर, दुसरीकडे नुकतेच जमिनीतून डोकावणाऱ्या अंकुरांना व शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्याची आस लागली आहे.

तालुक्यात जवळपास एक लाख हेक्टर वरील क्षेत्रावर खरिपाच्या प्रणेचे नियोजन असून यामध्ये सर्वाधिक पेरा हा सोयाबीनचा आहे त्याचबरोबर उडीद म्हणून तूर आदी पिकांचे नियोजन करण्यात आले आहे पेरणीसाठी शेतकऱ्यांनी गत एक महिन्यापासून रात्रंदिवस हाडाचे काडेकर शेती मशागतीचे काम पूर्ण केलेले आहे पावसाची आतुरतेने वाट पाहिली जात आहे. तर मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने व मूग मृग नक्षत्रात आलेल्या सरीवर शेतकऱ्यांनी छातीला माती लावत पेरणी चे काम आती घेतले तालुक्यात जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांनी पेरणी केली असून ६० टक्के शेतकऱ्यांच्या पेरण्या खुळमलेल्या आहेत. आता शेतकऱ्यांच्या नजरा ह्या आभाळाकडे लागलेल्या आहेत. एकीकडे शेतकरी वर्ग चे पाऊल आषाढी वारी निमित्त पंढरपूरकडे पडत आहे. तर, दुसरीकडे वरूण राजाने डोळे वटारल्याने शेतकऱ्यांच्या नजरा ह्या आभाळाकडे लागल्या आहेत.



मेहकर तालुक्यामध्ये जवळपास ४० टक्के पेरण्या आटोपल्या आहेत. व ६० टक्के पेरण्या खोळंबल्या असून आता. ज शेतकऱ्यांनी प्रेरणा केल्या आहेत. त्यांच्यावरही दुबार पेरणीच्या संकट आले आहे. या शेतकऱ्यांना शासनाने किमान खत आणि बियाणे उपलब्ध करून द्यावे अन्यथा शेतकऱ्यांवर आर्थिक संकट निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग मोठा संकटात पडला आहे शेतकऱ्यांचीही शेतकऱ्यांवर आलेल्या नैसर्गिक संकटाचा तोंड बाहेर पडण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना खत आणि बियाणे उपलब्ध करून द्यावे आणि ते कोणतेही आठ न लावता शेतकऱ्यांना वाटप करावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी केली आहे.

पेरणी केलेल्या अंकुर बियाणे अंकुरले असून नुकतेच जमिनीच्या वर डोकावत आहे. या अंकुरांना पावसाची अत्यंत आवश्यकता असताना वरून राजाने डोळे वटारल्याने नुकतेच जमिनीच्या वर डोकवणारे अंकुर पाण्याअभावी कोमेजून जात आहेत. गत दोन ते चार दिवसात पाऊस न आल्यास शेतकऱ्यांवर पुन्हा पेरणीचे दुबार पेरणीचे संकट वाढवण्याची भीती निर्माण झाली आहे. तर, कळमलेल्या पेरण्यामुळे शेतकरी वर्ग चिंता दूर झाला आहे. रोग नक्षत्र हा कोरडे गेल्याने व पेरण्या पुढे ढकलल्याने उत्पादनातही गट येण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे.जिल्ह्यात तालुक्यात पावसाची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली असून पावसाने दळी दिल्याने शेतकऱ्यांवर मात्र पुन्हा नैसर्गिक संकट कोसळले आहे.

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते समता फाउंडेशनचा सत्कार




**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** समता फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी जलतारा वत्सगुल्म स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात समता फाउंडेशन या सेवाभावी संस्थेचा सत्कार केला.

हा कार्यक्रम २१ जून रोजी वटाणे सभागृह वाशिम येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

१ मार्च ते ३० मे दरम्यान जलतारा उपक्रमांतर्गत संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये जलतारा खड्डे खोदण्यात आले. जलतारा उपक्रम ही एक लोक चळवळ व्हावी या दृष्टीने जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व सामाजिक संघटना व सेवाभावी संस्थानां या कार्यक्रमात सहभागी केले होते. जिल्हाधिकारी यांच्या महत्त्वकांक्षी जलतारा उपक्रमास जिल्ह्यातून सर्व संघटनांनी भरघोस प्रतिसाद दिला. रिसोड तालुक्यांमध्ये जलतारा उपक्रमामध्ये समता फाउंडेशनने पुढाकार घेत ६५६३ जलतारा खड्ड्यांपैकी २८०४ खड्डे शेतकऱ्यांना खोदून दिली समता फाउंडेशनच्या या सहकार्याने संपूर्ण वाशिम जिल्ह्यामधून वाघी या गावाला तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले तर रिसोड तालुक्यातील स्पर्धेमध्ये कंकरवाडीला प्रथम क्रमांकाचे तर घोटा गावाला द्वितीय क्रमांकाचे व गोहगावला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

जलतारा उपक्रमा मधील समता फाउंडेशनचा सहभाग व आरोग्य, शिक्षण, स्वयंरोजगार, जलसिंचन क्षेत्रातील सामाजिक कार्याची दखल घेत वाशिम जिल्हाधिकारी यांनी समता फाउंडेशनचा सत्कार केला. समता फाउंडेशन च्या वतीने कोर कमिटीचे सदस्य उत्तमचंदजी बगडे, संजय उकळकर, संतोष वाघमारे व समता ग्रुपचे जलतारा उपक्रमाचे इन्चार्ज सुरज गुप्ता उपस्थित होते. याप्रसंगी वाशिमचे आमदार शामजी खोडे, विधान परिषदेचे आमदार किरणराव सरनाईक, पोलीस अधीक्षक तारे सर्व प्रशासकीय अधिकारी व जलतारा प्रकल्पामध्ये सहभागी असलेले जिल्ह्यातील सर्वशेतकरी उपस्थित होते. माननीय जिल्हाधिकारी यांनी समता फाउंडेशनच्या कार्याची दखल घेत सत्कार केल्याबद्दल उत्तमचंद बगडिया यांनी जिल्हाधिकारी यांचे आभार व्यक्त केले.

## विजय देवरकोंडा अडचणीत, एससी-एसटी कायद्यांतर्गत तक्रार दाखल

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ सुपरस्टार विजय देवरकोंडा अडचणीत सापडला आहे, खरं तर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एससी–एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला एका चित्रपटाच्या रिलीजपूर्व कार्यक्रमादरम्यान आदिवासी लोकांबद्दल कथितपणे भाष्य केल्यानंतर विजय देवरकोंडावर एससी–एसटी (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी रविवारी सांगितलं. दरम्यान पोलिसांच्या म्हणण्यानुसार, एप्रिलमध्ये विजयनं पहलगाममधील अलीकडील दहशतवादी हल्ल्याची तुलना ५०० वर्षांपूर्वीच्या आदिवासी युद्धांशी केली होती. यानंतर तक्रारीच्या आधारे, १७ जून रोजी त्याच्याविरुद्ध एससी–एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला गेला असल्याचं समोर आलं होतं.

आदिवासी समुदायांच्या संयुक्त कृती समितीचे राज्य अध्यक्ष नेनावथ अशोक कुमार नाईक उर्फ अशोक राठोड यांनी ही तक्रार दाखल केली होती. राठोड यांनी आरोप केला की, अभिनेता सूर्या अभिनीत रेट्रो चित्रपटाच्या प्री–रिलीज कार्यक्रमादरम्यान देवेराकोंडानं आदिवासी समुदायांच्या भावना दुखावल्या आणि त्यांचा अपमान केला. त्यांनी पुढं असा दावा केला की अभिनेत्यानं आदिवासींची तुलना पाकिस्तानी दहशतवाद्यांशी केली आणि त्या टिप्पण्या त्यांच्यासाठी अपमानजनक होत्या.

: या घटनेनंतर विजय देवेराकोंडानं ३ मे रोजी एक्सवर एक पोस्ट शेअर केली. निवेदनात त्यानं म्हटलं आहे की, त्यांचा कोणत्याही समुदायाला, विशेषतः अनुसूचित जमातींना दुखावण्याचा किंवा लक्ष्य करण्याचा कोणताही हेतू नव्हता, तो त्यांचा खूप आदर करतो आणि त्यांना देशाचा अविभाज्य भाग मानतो. पुढं त्यानं असं लिहिलं होतं , जर माझ्या संदेशातील कोणताही भाग गैरसमज किंवा दुखावला गेला असेल तर मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो.

# सूर्यज्योत व सावली फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीतील वारकऱ्यांना फराळ वाटप

## वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंग सेवा – जगन जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

■ **देवानंद सानप**

**पुणे :** आषाढी एकादशीनिमित्ताने अखंड महाराष्ट्राचे दैवत पंढरपूर येथील विठ्ठल रुख्मीणीचे दर्शन आणि पायी दिंडी ही महाराष्ट्रातील जनतेसाठी धार्मिक पर्वणीच असते. त्या अनुषंगाने पंढरपुर येथे आषाढी एकादशीला लाखो भाविक दर्शनासाठी दाखल होतात. दिंडी मार्गावर महाराष्ट्रातील असंख्य दानशुर व्यक्ती विविध प्रकारचे दान करीत असतात. अन्नदान, महाप्रसाद, फराळाचे वाटप, आरोग्य सेवा असे विविध उपक्रम राबविले जातात. याच पार्श्वभूमीवर दि २३ जून २०२५ रोजी आषाढी एकादशीनिमित्त संत ज्ञानेश्वरांची पालखी सोहळा



पंढरपुराकडे प्रस्थान करीत असताना सासवड व जेजुरीच्या मध्ये माऊली माऊली,राम कृष्ण हरी नामघोष करीत सूर्यज्योत फाउंडेशन व सावली फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमानाने हजारो वारकरी बंधू भगिनींना पोषक फराळाचे व फळाचे तसेच पाणी बॉटल चे वितरण करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायाची सेवा



हीच खरी विठ्ठल सेवा असून हा उपक्रम दरवर्षी राबवणार असल्याचे प्रतिपादन सूर्यज्योत फाउंडेशनचे प्रसिद्धी प्रमुख.जगन जाधव यांनी केले हा आदर्शवत उपक्रम राबविण्यासाठी गोरख कसबे, नागनाथ शाहू,कार्तिक पारधे, मिलिंद बनसोडे,अतुल गाळे, गणेश शाहू,बाबू यादव,राजू गालफाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### १० ग्रॅम सोनं खरेदीसाठी 'इतके' पैसे मोजावे लागणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक घडामोडी आणि तणाव याचा परिणाम सोन्याच्या दरांवर होताना दिसत आहे. शर्णे् वर आज सोन्याच्या दरात किंचितशी घसरण होताना दिसतेय. तर, चांदीच्या दरात मात्र तेजी आली आहे. चांदी आज २७० रुपयांनी वाढून १०६४९४ रुपयांवर पोहोचली आहे. जागतिक स्तरावर इतक्या घडामोडी घडत असतानादेखील सोनं आणि चांदीच्या दरांवर कोणतेही मोठे बदल झालेले नाहीये. सोनं जवळपास ३३८० डॉलर आणि चांदी ३६ डॉलरच्या स्तरावर स्थिर आहे.

मागील आठवड्यात सोनं खरेदीदारांसाठी मोठा दिलासादायक ठरला होता. काही दिवसांपूर्वी सोन्याने १ लाखांचा टप्पा पार केला होता. मात्र त्यानंतर सोन्याचे दर उतरणीला लागले होते. आजदेखील सोनं एक लाखांवरच आहे मात्र आधीच्या तुलनेत दर काहीसे घसरले आहेत. येत्या काळात सोन्याचे दर आणखी कमी होण्याची शक्यता आहे. आज २४ कॅरेट सोन्याचे दर ६० रुपयांनी घसरले असून भाव १,००,६९० रुपयांवर पोहोचले आहेत.

### तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाची व्याप्ती वाढली, आणखी एका भाजप नेत्याला अटक, सोलापुरातून उचललं!

**धाराशिव/प्रतिनिधी :** धाराशिव जिल्ह्याच्या तुळजापूरमध्ये काही दिवसांपूर्वी ड्रग्ज रॅकेट उघडकीस आलं होतं. या प्रकरणात तब्बल ३८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. हे रॅकेट राज्यभरात ड्रग्जचा पुरवठा करत होती. या प्रकरणी पोलिसांनी खोलात जावून तपास केला असता, यात अनेक राजकीय कनेक्शन समोर आले. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत भाजपशी संबंधित पाच पदाधिकाऱ्यांना अटक केली होती. आता या प्रकरणात आणखी मोठा मासा गळाला लागला आहे.

पोलिसांनी भाजपच्या माजी नगराध्यक्षाला सोलापूर जिल्ह्यातील अकलूजमधून अटक केली आहे. संतोष कदम परमेश्वर असं अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. तो माजी नगराध्यक्ष आहे. एवढ्या मोठ्या पदावरील व्यक्तीचा ड्रग्ज प्रकरणात सहभाग असल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. आतापर्यंत पोलिसांनी एकूण २२ जणांना अटक केली. यातील सहा आरोपी हे भाजपशी संबंधित आहेत. त्यामुळे या प्रकरणात आणखी कुणाकुणाचं नाव समोर येणार? याबाबत सस्पेन्स वाढला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी रात्री नऊ वाजता ही कारवाई केली.

मिळालेल्या माहितीनुसार, तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात काही दिवसांपूर्वी भाजपचा माजी नगराध्यक्ष आरोपी विनोद ऊर्फ पिंटू गंगणे यास अटक केली होती. यानंतर पोलिसांनी अटकसत्र अधिक गतिमान केले. आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये भाजपच्या पाच पुढार्यांचा समावेश होता. आता हा सहावा आरोपी देखील भाजपचाच असल्याने ड्रग्ज तस्करीतील राजकीय धागेदोरे समोर येत आहेत. आजही १६ जण फरार आहेत. पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

तुळजापूरचे माजी नगराध्यक्ष संतोष कदम परमेश्वर यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे अकलूज येथून रविवारी रात्री नऊ वाजता अटक केली. यानंतर त्यास पुढील तपासासाठी तामलवाडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### शक्तीशाली बॉम्ब टाकून झाला, पण इराणनं सुद्धा जगाचं नाक झटक्यात दाबलं, अमेरिकेची अवघ्या काही तासात थेट चीनकडे मदतीची याचना!

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी चीनला इराणला जगातील सर्वात महत्त्वाच्या शिपिंग मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यापासून रोखण्याचे आवाहन केले आहे. इराणच्या सरकारी प्रेस टीव्हीने संसदेने सामुद्रधुनी बंद करण्याच्या योजनेला मान्यता दिल्याचे वृत्त दिल्यानंतर अमेरिकेची प्रतिक्रिया आली आहे. परंतु, अंतिम निर्णय सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेकडे असल्याचेही त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे अमेरिकेनं इराणमध्ये शक्तीशाली विमानांचा वापर करत तीन आण्विक तळ उद्धवस्त केले आहेत. अमेरिकेची युद्धात एन्ट्री झाल्यानंतर अवघ्या काही तासात इराणनं होर्मुझ बंदचा निर्णय घेतला.

इराणने थेट जगाचं नाक दाबण्याचा निर्णय घेतल्याने तेलाच्या पुरवठ्यात कोणताही अडथळा आल्यास त्याचे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतील. विशेषत: चीन हा इराणी तेलाचा जगातील सर्वात मोठा खरेदीदार आहे आणि त्यांचे तेहरानशी जवळचे संबंध आहेत. अमेरिकेने इराणी अणुस्थळांवर केलेल्या हल्ल्यानंतर तेलाच्या किमती वाढल्या असून बेंचमार्क ब्रेंट क्रूडची किंमत पाच महिन्यांतील सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे.

मार्को रुबियो यांनी रविवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ''मी बीजिंगमधील चीन सरकारला त्यांना (इराणला) याबद्दल बोलण्यास प्रोत्साहित करतो, कारण ते त्यांच्या तेलासाठी होर्मुझ सामुद्रधुनीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत,''

# उकळी येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते जोरदार स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शाळांची घंटी आज वाजली असून मेहकर तालुक्यातील उकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळेत आज आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रमुख उपस्थितीत इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले शालेय शिक्षण विभागाच्या शंभर शाळांना भेटी कार्यक्रम उपक्रमा अंतर्गत आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज पीएम श्री जिल्हा परिषद शाळा उकळी शाळेला भेट देऊन कार्यक्रमांना हजेरी लावली व मार्गदर्शन केले. सर्वप्रथम गावातून सजवलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची प्रवेश दिंडी काढण्यात आली यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी लेझीम कवायत सादर केली तर गावातील भजनी मंडळाच्या महिलांनी सुद्धा या दिंडीत सहभाग नोंदवला. ही दिंडी शाळेत आल्यावर इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे आमदार सिद्धार्थ खरात व मान्यवरांनी स्वागत केले. तसेच त्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, पुस्तकांचे सुद्धा वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार सिद्धार्थ खरात बोलले की आपल्या देशाला समृद्ध होण्यासाठी, प्रगतीपथावर जाण्यासाठी विमान, जहाज यांची आवश्यकता नसून माणसं घडवणारा जो कारखाना आहे त्यात सृजनशील शिक्षकांची आवश्यकता आहे व हे सृजनशील शिक्षक जिल्हा परिषद शाळेत मोठ्या संख्येने आहेत याचा अभिमान वाटतो. उकळी शाळेने आयोजित केलेला कार्यक्रम खरोखरच खूपच चांगला असून याचे सर्व श्रेय शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व शाळेतील शिक्षकांना जाते.अशा जर शाळा असतील , शिक्षक असतील, संस्कार असतील तर आपला देश लवकरच सुपर पॉवर होईल.विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेत जे संस्कार व्हायला पाहिजे ते सर्व संस्कार जिल्हा परिषद शाळेत सुद्धा होतात. आज इंग्रजी शाळांच्या स्पर्धेत सुद्धा जिल्हा परिषदेच्या शाळा प्रचंड मेहनत घेत आहेत व आपले नाव टिकवून ठेवण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नौकरी करताना सीईटी,टीईटी मधून जावे लागते. त्यामुळे यापुढे मी आमदार म्हणून विधानसभेत प्रश्न मांडताना व निधी मागताना सर्व जि.प. शाळांना





भौतिक सुविधा तात्काळ मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करणार आहे असे उद्गार सुद्धा आमदार सिद्धार्थ खरात यांनी काढले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सविता घाटोळ होत्या तर कार्यक्रमाला सरपंच जनाबाई जेठे, उपसरपंच दिलीप नालेगावकर , शिक्षण विस्तार अधिकारी तथा संपर्क अधिकारी शरद काळे, केंद्रप्रमुख विलास शेळके ,उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवा सेनेचे तालुका अधिकारी आकाश घोडे, अमोल बोरे, सुरेश सोनुने, सत्यजित अर्बनचे संचालक सुरेश मुंदडा, मनोज लोहिया, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख नाजुकराव देशमुख ,उच्च श्रेणी मुख्याध्यापक गजानन अंभोरे सह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सविता नामदेव घाटोळ, उपसरपंच दिलीप नालेगावकर, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख एन जी देशमुख, सुरेश मुंदडा, मनोज लोहिया यांची सुद्धा भाषणे झाली .प्रास्ताविक मुख्याध्यापक गजानन अंभोरे यांनी केले. संचालन शिक्षक किरण डोंगरदिवे यांनी तर आभार विनोद दुतोंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील ईतर शिक्षक दिलीप डव्हळे, शैलेश देशमुख, संदीप लादे, नरेश दसरे, शिक्षिका कुमारी नूतन महेश कुमार दीक्षित, सविता बबन रत्नपारखी, सविता यशवंत कावरे यांनी सुद्धा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश पांढरे, पोलीस पाटील नवले, विष्णू जेठे , रामेश्वर सासवडकर, राजेश अंभोरे, बाजीराव बोरे, रामेश्वर पातळे, तात्याराव तुरूकमाने, प्रकाश मोरे,कृपाळ ग्रामसेवक , आरोग्य, अंगणवाडी कर्मचारी सह गावातील नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'मम्मी, मी विष प्यायलो आहे, माझा मृतदेह घेऊन जा', पुण्यात १८ वर्षीय तरुणाची आत्महत्या

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात एका १८ वर्षीय तरुणाने आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्या तरुणाने एक ऑडिओ आणि व्हिडिओदेखील रेकॉर्डिंग केले होते. ज्यामध्ये त्याने म्हंटले होते की ''मम्मी, मी माझा मोबाईल फोडून टाकेन. कोणताही पुरावा मिळणार नाही. मला मरायचे आहे. मी विष प्राशन केले आहे. मी तुला लोकेशन पाठवले आहे. तिथून माझा मृतदेह घेऊन जा.''

सदर घटना पुण्यातील देहू रोड पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव संजय कुमार विनोदकुमार राजपूत असे आहे. त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नसले तरी, त्याने नैराश्यामुळे आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज देहूरोड पोलिसांनी वर्तवला आहे.

ही घटना काही दिवसांपूर्वीची असून, दिनांक १७ जून रोजी देहूरोड पोलिस ठाण्यात संजय कुमार बेपत्ता असल्याची तक्रार दाखल त्याच्या कुटुंबीयांकडून करण्यात आली होती. अखेर शनिवारी त्याचा मृतदेह घोरवडेश्वर टेकडीच्या पायथ्याशी आढळला. मृतदेहाजवळ विषारी औषधाची बाटली आढळली. पोलीस तपासात संजय कुमारने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्येही तेच म्हटले आहे.

आत्महत्येपूर्वी बनवला व्हिडिओ

संजय कुमार पिंपरी-चिंचवड परिसरात त्याच्या कुटुंबासह राहत होता. त्याच्या कुटुंबात त्याचे पालक आणि दोन बहिणी आहेत. संजय कुमारने आत्महत्येपूर्वी ऑडिओ रेकॉर्ड केला होता. ऊं ऑडिओमध्ये त्याने त्याच्या बहिणींबद्दल चिंता व्यक्त केली आणि पालकांना त्यांना उच्च शिक्षण देण्याची विनंती केली. तसेच आत्महत्येचा एक व्हिडिओ देखील त्याने बनवला, ज्यात त्याने विष प्राशन केल्याचे सांगितले. यामध्ये तो प्रचंड नैराश्यात दिसत होता. आत्महत्या करण्यासाठी त्याने ऑनलाइन विषारी औषध मागवले होते. त्यानंतरच त्याने हे पाऊल उचलले. सध्या पोलीस आत्महत्येपूर्वी रेकॉर्ड केलेल्या ऑडिओ आणि व्हिडिओची चौकशी करत आहेत.

## शेतकऱ्यांना बियाणे उगवण क्षमते बाबत मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय दारव्हा येथील कृषी दूतांनी बियाणे उगवण क्षमते संदर्भात दारव्हा तालुक्यातील शेलोडी या गावात जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकरी शेतामध्ये बियाणे पेरतो आणि ते ५ ते ७ दिवसानंतर उगवले की नाही हे तपासण्या करिता शेतात जातो आणि काही वेळेस न उगवलेले बियाणे पाहून तो निराश होतो. आणि तसेच बीजप्रक्रिया न केल्यामुळे बियांना काही बीजजन्य रोग पण होऊ शकतात. हे टाळण्या




करिता बियाणे उगवण क्षमता व बिजप्रक्रियेचे फायदे - उदा. जमिनीतून व बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांचा उदा. मर रोग आणि मूळ कूज इ. प्रादुर्भाव टाळता येतो. बियाण्याची उगवण क्षमता वाढते. रोपे सतेज व जोमदारपणे वाढतात. पिकाच्या उत्पादनात वाढ होते. बिजप्रक्रियेसाठी कमी खर्च येतो, त्यामुळे ही कीड/रोग नियंत्रणाची किफायतशीर पध्दत आहे. किती आवश्यक आहे हे कृषी महाविद्यालय दारव्हा येथील विध्यार्थी कृषीकुमार आदित्य दळवी ,सौरभ धाबेकर, पीयूष ढ़वस , योगेश दुबे,चेतन दुर्गे यांनी हे शेतकऱ्यांना समजावून सांगितले. सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाचे प्राचार्य पंकज खाडे सर व वनस्पती शास्त्र विषयाचे प्राध्यापक ए .आर. लुंगे सर कार्यक्रम अधिकारी देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्याचप्रमाणे शेलोडी या गावातील चंद्रकांत चौधरी, हेमंत ठोकळ,दत्ता पाठे,ज्ञानेश्वर चव्हान,गोलू भोयर व इतर शेतकरी उपस्थित होते.

### त्वचेचा कॅन्सर असलेल्या आजीला नातवाने कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकलं; मुंबईतील मन सुन्न करणारी घटना

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत माणुसकीला काळिमा फासण्याचा प्रकार समोर आला आहे. त्वचेचा कॅन्सर असलेल्या स्वत:च्याच आजीला नातवाने आरेमधल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार घडला. सदर घटनेची माहिती मिळताच या महिलेला पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले असून तिच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

यशोदा गायकवाड असे या वृद्ध महिलेचे नाव असून तिच्यावर कूपर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यशोदा गायकवाड या त्यांच्या नातवासोबत मालाड परिसरात राहतात, अशी माहिती त्यानी पोलिसांना दिली असून पोलीस त्यांच्या कुटुंबियांचा शोध घेत आहेत. यशोदा गायकवाड यांना बोलता येत नाही. त्या फक्त नातू-नातू असं सांगत आहे. त्यामुळे आरे पोलिसांना वृद्ध आजीचा कुटुंबियांचा शोध घेण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. आरे परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक तपास करत आरे पोलीस वृद्ध आजीचा कुटुंबीयांचा शोध घेत आहेत, अशी माहिती आरे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक रवींद्र पाटील यांनी दिली.

नेमकं प्रकरण काय?

६० वर्षीय यशोदा गायकवाड यांना त्वचेचा कॅन्सर होता. यामुळे त्यांच्या नातवाने त्यांना मुंबई उपनगरमधील आरेमधल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकलं. यशोदा गायकवाड या मालाडमधील रहिवाशी आहेत. त्या नातावासोबत वास्तव्यास होत्या. सदर प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी यशोदा गायकवाड यांना तात्काळ रुग्णालयात दाखल केलं. सध्या कूपर रुग्णालयात यशोदा गायकवाड यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच यशोदा गायकवाड यांच्या नातेवाईकांचा शोध सध्या पोलिसांकडून घेण्यात येत आहे.

कामोठ्यात हिट ॲण्ड रनचा थरार-

नवी मुंबईतील कामोठे सेक्टर ६ येथील सरोवर हॉटेलसमोर मद्यधुंद चालकाने स्विफ्ट कारने एका महिलेला धडक दिली. अपघातानंतरही चालकाने

# वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बिबी येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बिबी व वसंत प्राथमिक शाळा बिबी येथे दिनांक २३ जून २०२५ रोजी शाळा प्रवेशोत्सव निरनिराळ्या कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा झाला. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्या सर्व विद्यार्थी एक पायरी वर चढत पुढच्या वर्गात गेले. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी त्यांचा आनंद द्विगुणित व्हावा यासाठी सर्व शिक्षकांनी शाळा प्रवेशोत्सवासाठी निरनिराळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

आजच्या प्रवेशोत्सवाची सुरवात चिमुकल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ आणि गुलाबपुष्प देऊन रामकृष्ण शिक्षण प्रसारक संस्था (हनवतखेड)



बिबी चे विद्यमान सचिव तथा माजी समाज कल्याण सभापती आमचे आधारस्तंभ आणि मार्गदर्शक श्री अभय भाऊ चव्हाण यांनी शाळेच्या गेटवरच केले.

तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर फुले व पाकळ्यांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत केले यावेळी फलक लेखन, निरनिराळ्या सुंदर रांगोळ्या,सेल्फी पॉईंट पाने, फुले व फुगे इत्यादी साहित्याचा वापर करून वर्ग व शाळेची सजावट करण्यात आली होती यावेळी वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चे प्राचार्य श्री आर बी राठोड सर यांनी मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय श्री अभयभाऊ चव्हाण उपस्थित होते त्यांनी शब्द सुमनांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ साठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. आज नविन सत्रात नविन रुजू झालेल्या शिक्षकांची ओळख करून देण्यात आली ज्यामध्ये कैलास तरवडे सर, प्रा.अंकित चनखोरे सर, प्रा. प्रदीप दानवे सर, संतोष बुरकुल सर, प्रीति चव्हाण मॅडम व कु दिव्या महाजन मॅडम यांचे अभिनंदन आणि स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविक प्रा.पी टी हरकळ यांनी, संचालन श्री कडुबा खंदारे सर आणि आभार प्रदर्शन प्रा विजय बाजड सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी वसंत प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री भारत जायभाये सर,वसंतराव नाईक उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य श्री एस आर राठोड सर, पर्यवेक्षक श्री एस एन बोडखे सर सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका,शिक्षक, शिक्षिका तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव बनले विद्यार्थ्यांचे सारथी

## पहिल्या दिवशी शाळकरी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : उन्हाळ्याच्या सुट्ट्यांनंतर आजपासून शाळाचे सत्र सुरु झाले असून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी मेहकर तालुक्यातील मादणी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे सारथी बनून बैलगाडीने शाळेत आणले.**

दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर विदर्भातील शाळेची पहिली घंटा सोमवारी २३ जूनला वाजली. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वागत केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांनी मादणी येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित 'शाळा प्रवेशोत्सव' कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातून प्रवेशोत्सव दिंडी वाजतगाजत काढण्यात आली. या शाळा प्रवेशोत्सवात विद्यार्थ्यांना अद्ययावत दफ्तर आणि शालेय गणवेश वाटप करणेयात आले.

केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारातून बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या जवळपास १७ हजार विद्यार्थ्यांना या अद्ययावत स्कूल बॅग वाटप करण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ शाळा प्रवेशोत्सवात जिल्हा परिषदेच्या मादणी शाळेपासून करण्यात आला. ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण व्हावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुद्धा चांगले दर्जेदार शैक्षणिक साहित्य मिळावे, या हेतूने ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी या स्कूल बॅग वाटप करण्यात येत आहे. ज्या शाळेत शिकलो त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत आज प्रवेशोत्सवच्या निमित्याने करण्याचे भाग्य मला मिळाले. जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या बुलडाणा जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना अद्ययावत स्कूल बॅग देण्याचा शुभारंभ आज मादणी गावातून सुरु केला असल्याचे त्यांनी सांगितले.

## विविध वृत्त...

### शेतकऱ्याची पिकाचे नुकसान झाले तर महावितरण ने नुकसान भरपाई भरुन द्यावी - ऋषिकेश ठाकूर



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुक्यातील जे दोन केशवनगर व मांगूळ झनक जे सब स्टेशन आहेत तिथे गेल्या काही दिवसा मध्ये लाईन् सुरुळीत चालत नाही, या दिवसा मध्ये पाऊस नांही शेतकरी पेरणी करून बसले, सिंचन द्वारे पाणी देण्यात येत आहे परंतु लाईन् टिकत नसल्यामुळे सिंचन ने पाणी देता येत नाही, त्या मुळे मनसे विध्यार्थी तालुका अध्यक्ष रिसोड श्री. ऋषिकेश ठाकूर ने महावितरण आज निवेदन द्वारे असा इशारा दिला कि जर शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाल्यास महावितरण ला त्याची नुकसान भरपाई करावी लागेल, व मनसे स्टईल ने आंदोलम करण्यात येईल असा इशारा त्यानी दिला, या वेळी माजी सरपंच दिपक भाऊ वाघ, उप सरपंच प्रमोद वाघ, नागोराव नवले, विजय मानेकर, योगेश वाघ, विठ्ठल वाघ, अशोकराव देशमुख, स्वप्नील कावरखे, सचिन मुळे, इत्यादी उपसिथ होते.

### विदर्भ कन्या शाईन पटेल यांनी दिला विद्यार्थ्यांना पेनचा अनोखा खजिना



दैनिक आपला विदर्भ

**सुलतानपूर/प्रतिनिधी :** समाजसेवा आणि शिक्षणविषयक उपक्रमांमध्ये नेहमीच पुढाकार घेणाऱ्या विदर्भ कन्या शाईन पटेल यांनी एक प्रेरणादायी उपक्रम राबवत सुलतानपूर जिल्हा परिषद मराठी कन्या शाळा आणि जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना पेन वाटप केले आहेत.



त्यानंतर शाईन पटेल यांच्या हस्तेच शाळेतील शाळेचे शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तके, शालेय बॅग, नवीन शूज वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.याच कार्यक्रमात शाईन पटेल यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. ज्यातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जपण्याबाबत जागरूकतेचा संदेश दिला गेला. कार्यक्रमानंतर शाळेच्या वतीने शाईन पटेल यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले , ''अशा उपक्रमातून समाजातील तरुणांनी प्रेरणा घेणे आवश्यक आहे. शाईन पटेल यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असून, शिक्षणाला आणि पर्यावरणाला चालना देणारा हा उपक्रम भविष्यात इतर ठिकाणीही राबवावा, अशी अपेक्षाही विद्यार्थ्यांपासून पालकांपर्यंत सर्वांनी व्यक्त केली आहे.

## नगर परिषद क्षेत्रातील शासकीय जागा नियमानुकूल होण्याचा मार्ग मोकळा

### न प ने भरली भूमी अभिलेखला फी



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील नगर परिषद हद्दीतील शासकीय जागा नियमाकुल करून संबंधित लोकांच्या स्वाधीन करावी यासाठी गेली अनेक दिवसापासून इंदिरा नगर,रामनगर,गौस पुरा , गजानन नगर , जिजाऊ नगर, कैलास नगर समता नगर माणुसकी नगर येथील शासकीय जागेवर राहणारे नागरिक हे शासकीय योजनेपासून वंचित होते चामुळे जागा ह्या नियमकुल नव्हत्या यासाठी गेली अनेक वर्षापासून या भागातील नागरिक सातत्याने निवेदने आंदोलने करत होते त्यांच्या या आंदोलन व निवेदनाला अखेर यश आले असून नगरपरिषद ने जागा नियमकुल करण्यात संदर्भात मोजणीसाठी शासकीय फी भरली असून लवकरच आता या भागातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे जागा नियमाकुल करण्यासंदर्भात भूमी अभिलेख कार्यालयात फी भरल्यानंतर या संदर्भात हालचालींना वेग आला आहे यामुळे आता या भागातील नागरिकांना त्यांचे हक्काचे घर मिळणार असून लवकरच आता या भागातील नागरिक हे शासकीय योजनेचा लाभ घेता येणार आहे.

या संदर्भात या भागातील नागरिकांची मागणी रास्त होती या संदर्भात नगरपरिषद गेली अनेक दिवसापासून योग्य ती प्रक्रिया करत होती. यामुळे आता भूमी अभिलेख कार्यालया कडे फी भरल्यानंतर जागा नियमकुल करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत.

**–सतीश शेवदा**
**मुख्याधिकारी न प रिसोड**

या करीता गेली अनेक वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करत आहोत. नगरसेवक नात्याने माझे कर्तव्य होते. या भागातील नागरिकांना सुविधा पुरवणे हे अत्यंत गरजेचे होते. जागा नियमकुल संदर्भात गेल्या अनेक वर्षापासून या भागातील नागरिकांची मागणी आता पूर्ण होण्याच्या दिशेने काम सुरू झाले आहे.

**–संतोष चराटे,**
**मा.नगरसेवक**

बरेच दिवसापासून आमची या संदर्भात आमची मागणीत होती मागणी पूर्ण झाल्यामुळे तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळणार असल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**–सय्यद अफजल,**
**इंदिरानगर रिसोड**

### लोकलच्या महिलांमधील मारहाणीचं धक्कादायक सत्य समोर!

**मुंबई/प्रतिनिधी :** चर्चगेट-विरार महिला विशेष लोकलमध्ये दोन महिलांमध्ये हाणामारी झाल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. या हाणामारीत एक महिला रक्तबंबाळ झाली होती. १७ जून रोजी मिरा रोड-भाईदर दरम्यान घडलेल्या या घटनेचा व्हिडीओ दोन दिवसांनी सोशल मीडियावर चर्चेत आला होता. याप्रकरणी कोणीही तक्रार दिली नसल्याने, गुन्हा दाखल नसल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र आता जखमी महिलेने काही गंभीर आरोप केले आहेत. तसंच पोलिसांनी पाच दिवसांनी गुन्हा दाखल केला आहे. ३१ वर्षीय कविता मेदाडकर यांनी विरारला जाण्यासाठी मिरा रोड येथून लोकल पकडली होती. त्या विरारच्या फूलपाडा येथे वास्तव्यास आहेत. लोकलमध्ये चढताना त्यांचा दरवाजात उभ्या २१ वर्षी ज्योती सिंगसोबत वाद झाला. शाब्दिक वाद सुरु असताना काही वेळाने त्यांच्यात हाणामारी सुरु झाली.

## शिक्षण मंत्र्यांच्या शाळा भेट, विद्यार्थ्यांकडून स्वच्छता करून घेतली

- दादाजी भुसे आज सिनगाव जहागीर येथे येत आहेत
- शाळेच्या पहिल्याच दिवशी घडला प्रकार



उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर आज विदर्भातील शाळांचा शैक्षणिक सत्र सुरू होत आहे.. आणि त्यानिमित्त राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे हे बुलढाणा जिल्ह्यातील सिनगाव जहांगीर येथील प्राथमिक शाळेवर विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहे... मात्र दादा भुसे पोहोचण्याच्या आधीच शिक्षकांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी शाळा झाडणे, कचरा उचलणे या कामाला लावल आहे.. एकीकडे विद्यार्थ्यांचं स्वागत करण्याची भाषा तर दुसरीकडे विद्यार्थ्यांकडूनच शालेय काम करून घेण्याचा सपाटा दादा भुसे यांच्या कार्यक्रमात दिसत आहे.

### सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करताच

## खड्डे तात्काळ बुजवण्यास सुरुवात

### महामार्ग अधिकारी यांनी घेतली आंदोलनाची दखल

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे



**महारचिकना:** लोणार तालुक्यातील ब्राह्मण चिकना गावाजवळ रोडवर मोठा खड्डा पडला होता याठिकाणी बर्याच वेळा लहान मोठे अपघात सुद्धा घडले होते या खड्ड्यांची माहीती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली होती परंतु त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे लक्षात येताच भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी या खड्यावर अपघात होऊन जर काही जिवीतहानी झाली तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी पत्रकार परिषदेत केली होती त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुलतानपुर ते दुसरबिड महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवण्यास सुरूवात केली

भारतीय जनता पक्षाच्या एका पदाधिकार्याने आंदोलनाचा इशारा देताच खड्डे तात्काळ बुजविले यांनी आंदोलनाचा इशारा दिला नसता तर मग संबंधित अधिकारी खड्डे बुजविण्यासाठी कशाची वाट पाहत होते असा प्रश्न परीसरातील नागरीक विचारीत आहेत

# शाळा हेच संस्कारांचे मंदिर : ॲड.जयश्री शेळके

## » गणवेश-साहित्य वाटपाने शाळेची रंगत वाढली

## » शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी :** नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होताच विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह, नव्या स्वप्नांची बीजं रोवली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर जहांगिरपूर (ता. मोताळा) येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहवर्धक स्वागत करण्यात आले. तसेच शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड. जयश्री शेळके यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. लहानग्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा



आनंद पाहून उपस्थित मान्यवरांच्या चेहऱ्यावरही समाधानाचे हास्य झळकले. गावातील नागरिक, पालक, शिक्षक, आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या उत्साहात भर घातली.

जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक शाळेला गावातील शेख सुपडू शेख आलम, फिरोज खान, युनूस खान, शेख अमीन, उस्मान शहा यांच्यावतीने स्वतःच्या मालकीची जागा शालेय उपयोगासाठी देण्यात आली. तसेच शेख रहिम, शेख सईद यांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. त्याअनुषंगाने उपरोक्त सर्वांचा शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

तसेच जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येथे ॲड.जयश्री शेळके यांनी भेट देऊन शालेय साहित्य व खाऊ वाटप केले. यावेळी कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी धंदर साहेब, पंचायत समितीचे माजी उपसभापती युनूसशेठ, शिवसेना तालुकाप्रमुख विजय इंगळे, सरपंच प्रभाकर इंगळे, उपसरपंच जयचंद्र चोपडे, तंटामुक्ती अध्यक्ष रहिम ठेकेदार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेख सईद, समाधान राऊत, ग्राम पंचायत सदस्य शेख खलिल ठेकेदार, जयंत चोपडे, रेखाताई इंगळे, विजय चव्हाण, शेख अन्वर, मौलाना युसुफ, केंद्र प्रमुख नंदिनी पवार, जि.प.उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जुनेद सर, सहाय्यक शिक्षक नसीम सर, जि.प.मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वाघ, सहाय्यक शिक्षक सुनिल वाघ यांची उपस्थिती होती.